## Area 2a: Single Window

**15:** Ensure that the single window body/ bureau has been set up through a legislation/State notification

---

**Response:** Yes

**Remarks:**

Government of Maharashtra institutionalised Maharashtra industry trade and investment facilitation cell - **'MAITRI'** on 27th February 2014 under the aegis of Industries Department.


The Government Resolution dated 11th February 2016 (MIM 2015/PK 105 / Udyog 8), has empowered '**MAITRI'** as state's Single Window for all investment & Industry related information and services. It is supported by the underlying framework of 'Seva Hami Kayada' or 'The Right to Public Services Act', which was enacted on August 21, 2015.

The act ensures transparency, timeliness and accountability in the services rendered by the MAITRI.

**Web Link:**

MAITRI - Single Window GR 2016 and the Right to Public Services Act 2015 are available on MAITRI Single Window portal under the GR section:

https://www.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/English/201602111743141610.pdf



**Supporting Documents:**

Relevant extracts of the MAITRI Single Window GR is as follows:

उद्योगांना सर्व मंजुऱ्या एकाच ठिकाणी देण्यासाठी एक खिडकी योजना राबविणे - "मैत्री कक्ष" सक्षम करणे.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
शासन निर्णय क्रमांक मेइम २०१५/ प्र.क्र. १०५/ उद्योग-८
दिनांक - ११ फेब्रुवारी, २०१६

संदर्भः-

१) शासन निर्णय उद्योग विभाग क्र. ई-बीझ-२०१३/प्र.क्र. ११७/उद्योग-८, दि. ०१/०३/२०१४.
२) शासन निर्णय उद्योग विभाग क्र. मेइम-२०१४/प्र.क्र. ८८/उद्योग-८, दि. ०८/०१/२०१५.
३) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक - २१/०८/२०१५.
४) केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालय पत्र क्र. अर्धशासकीय पत्र क्र. १०(४५)/२०१५-BE.I, दि. ०१/१०/२०१५

प्रस्तावना-

केंद्र शासनाने दि. २९ डिसेंबर, २०१४ रोजी "मेक इन इंडिया" या विषयावर आयोजित केलेल्या एका राष्ट्रीय कार्यशाळेत "व्यवसाय करणे सोपे" Ease of doing Business करण्यासाठी राज्याला घालून दिलेल्या मुदतीत अंमलबजावणी करण्याकरीता ९८ शिफारशी केल्या होत्या. "व्यवसाय करणे सोपे" करण्याच्या संबंधात जागतिक बँकेने केलेल्या सर्वेक्षण अहवाल सन २०१५-१६ मध्ये जागतिक स्तरावर देशाच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक १३० वर असून या क्रमवारीत पहिल्या ५० मध्ये भारताचा क्रमांक यावा म्हणून, मा.पंतप्रधानांनी आवश्यक ते सर्व उपाय योजण्यावर भर दिला आहे. केंद्र शासनाच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने या संबंधात केलेल्या शिफारशींपैकी, राज्यात उद्योग उभारण्यासाठी आवश्यक मंजुऱ्या मिळवून देण्याकरीता एक खिडकी योजनेची अंमलबजावणी करणे, ही एक महत्वाची शिफारस आहे. त्यास अनुसरुन मुख्य सचिवांनी राज्यात एक खिडकी योजना राबविणे बाबत "मेक इन इंडीया" कार्यशाळेत उपस्थित मान्यवरांना आश्वासित केले आहे. मा.मुख्यमंत्री तसेच मा.मुख्यसचिव यांचे स्तरावर "मेक इन इंडीया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे.

जागतिक बँकेच्या व्यवसाय करणे सोपे करण्यासंबंधीच्या अहवालातील एकूण क्रमवारीत भारताचा क्रमांक वर यावा आणि "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रम यशस्वी व्हावा म्हणून संबंधित उद्योग स्थापण्यासाठी आवश्यक विविध यंत्रणांकडून ना हरकते व परवाने यांच्या प्रक्रीया/ टप्पे व त्यास लागणारा कालावधी कमी करणे अपेक्षित आहे. "एक खिडकी योजना" परिणामकारकपणे राबविल्यास हा उद्देश साध्य करता येईल.

११. वित्तीय तरतुदः-

"मैत्री" कक्षाला निधी पुरवठा राज्यशासनातर्फे दर वर्षी अंर्थसंकल्पिय तरतुदीद्वारे पुरविण्यात येईल. याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येईल, याकरिता पुरवणी मागणीद्वारे विधी मंडळास सादर करण्यात येईल. तथापि सदर कक्ष लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याकरिता अंर्थसंकल्पिय तरतूदीद्वारे निधी उपलब्ध् होईपर्यंत सदर कक्षाकरिता निधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून घेण्यात येईल. या निधीमधुन मैत्री साठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांचे मासिक वेतन व भत्ते, कार्यालयीन खर्च, वाहन / इंधन व इतर तत्सम खर्च करणे अपेक्षित आहे. सदर कक्षातील पद निर्मिती करीता वार्षिक अनावर्ती खर्च रू. १२.३६ कोटी व रू. १ कोटी अनावर्ती खर्च असा एकुण रू. १३.३६ कोटी खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७३/२०१५ दि.१८.१२.२०१५ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२१११७४३१४१६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Apurva Urvesh Chandra
Digitally signed by Apurva Urvesh Chandra
DN: c=IN, o=All India Services, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, cn=Apurva Urvesh Chandra
Date: 2016.02.11 19:09:28 +05'30'

(अपुर्व चंद्रा)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व संबंधित मा.मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व संबंधित मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र , मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर,